**नि. दि.ख.कं. :-२३३/२०१५**
**जमिल - वि - सुलतान**
**<u>नि.क :- ४३</u>**

**<u>उलट तपास शपथेवर पुन्हा सुरु प्रतिवादीतर्फे श्री. एस. एम. कुशवाह वकिल साहेब-</u>**

७. दिनांक १७.०९.१९३८, ८.८.१९५७ या खरेदी खताबाबत माहीती नाही. प्रतिवादींनी अभिलेखावर वरील खरेदीखतांच्या प्रती दाखल केल्या किंवा काय याबाबत मला माहीती नाही. त्याबाबत मला माझे वकीलांनी माहीती दिली नाही. मी अब्दुल रज्जाक वल्द अ. करीम याला ओळखतो. त्यांना ६ अपत्ये आहेत. त्यांची नावे अब्दुल वहाब, रहमतबी, जुबेदाबी, सुलतान अहमद, सुगराबी व मुनीर अहमद अशी आहेत.

८. चंपालाल मारवाडी या नावाच्या इसमास मी ओळखत नाही. घर क्रमांक एम/२०३, एम/२१६ व एम/२०० बाबत मला माहीती आहे. अब्दुल रज्जाक यांनी या तीनही मिळकती चंपालाल मारवाडी यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतल्या होत्या किंवा काय याबाबत मला माहीत नाही.

९. मुन्नाबी ज. मो. कासीम हिला मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की तिने वरील नमुद तीनही मिळकती चंपालाल मारवाडी यांना विकल्या होत्या. दस्त यादी निशानी ६२ खाली दाखल दस्त हलीमा बी ने दाखल केलेल्या प्रकरणात दाखल केलेले आहे. त्या प्रकरणामध्ये मुन्नाबी चे मकानाबाबत कागद दाखल केला होता. ती कागदपत्रे मी पाहिली होती. तो कागद घर क्रमांक एम/२०३, एम/२१६ व एम/२०० बाबत होता किंवा काय याबाबत मला माहीती नाही.

१०. मेहेरइलाही याला मी ओळखतो. त्याचे विरुध्द मी कोणतेही प्रकरण दाखल केले नाही. मेहेरइलाही याचे लाभात असलेले विक्रीपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. साक्षीदाराने सदरचा दस्त उलट तपासादरम्यान मान्य केलेला असल्यामुळे त्यास नि. ६५ देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की मेहेरइलाही ला घर क्रमांक एम/२०२ त्या खरेदीखतादवारे विकण्यात आला होता. ते खरेदी खत

अंदाजे ३० वर्षापूर्वीचे असावे. हे म्हणणे खरे आहे की खरेदीखताचे तारखेपासून तो त्या घरात राहत आहे. मी त्याचेविरुध्द सदरचे खरेदी खत खोटे असल्याबाबत कोणतेही प्रकरण दाखल केले नाही.

**<u>प्रतिवादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब -</u>**

वा.दा.ब.अ.क.के समक्ष

(आर.पी. बाठे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क-स्तर,
कामठी.

(आर.पी. बाठे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,क-स्तर,
कामठी.

दिनांक :-१५/०९/२०१७.